महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या
पदवी/ पविका समकक्ष ठरविणेबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.५/२००१/३९
मंत्रालय , मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २.८.२००३

वाचा :

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : प्रशिक्षण-२००१/प्र.क्र. १४३/३९ दिनांक १०.७.२०००
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : प्रशिक्षण-२००१/ प्र.क्र. ६१/२००१/३९ दिनांक ७.८.२००१
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : प्रशिक्षण-२०००/ प्र.क्र. ५/२००१/३९ दिनांक २०.७.२००२
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : प्रशिक्षण-२००२/प्र.क्र. ५/२००१/३९ दिनांक ४.१०.२००२

प्रस्तावना : दिनांक २०.७.२००२ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.१ (VII) मधील तरतूदी प्रमाणे अधिकारी /कर्मचाऱ्यांनी D.O.E.A.C.C. अथवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळामार्फत पदवी/पदविका उत्त्तीर्ण करून प्रमाणपत्र प्राप्त केले असल्यास त्यांनी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळामार्फत घेतल्या जाणाऱ्या MSCIT किंवा CCC परिक्षा पुन्हा उत्त्तीर्ण करणे आवश्यक नाही. तथापी, सदर शासन निर्णयात राज्य मंडळाच्या कोणत्या पदवी/पदवीका MSCIT या शैक्षणिक अर्हतेशी समकक्ष/उच्च आहे, याबाबत उल्लेख नाही. याबाबत महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे. :-

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या खाली नमूद केलेल्या पदवी/पदविका/पदव्युत्तर पदविका उत्त्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना, MSCIT किंवा CCC परिक्षा पुन्हा उत्त्तीर्ण करणे आवश्यक राहणार नाही.

| अ.क्र | म.रा.तंत्रशिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाचे नाव | स्तर |
|---|---|---|
| १ | संगणक तंत्रशास्त्र (Computer Technology) | पदविका |
| २ | संगणक अभियांत्रिकी(Computer Engg) | पदविका |
| ३ | माहिती तंत्रज्ञान (Information Technology) | पदविका |
| ४ | संगणक उपयोजन (Computer Application) | पदविकोत्तर पदविका |
| ५ | संगणक उपयोजन पद्धती व पृथक्करण (ADCSSAA) | पदव्युत्तर /प्रगत पदविका |
| ६ | माहीती तंत्रज्ञान ( Information Technology) | पदव्युत्तर पदविका |

हे आदेश शासकीय, निमशासकीय कार्यालय, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका, महामंडळे, मंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, शासनाच्या अधिनस्त आणि शासनास संलग्न संस्थाा इत्यादींना लागू होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(नितीन गद्रे)
सह सचिव तथा संचालक (मा. त)

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव
मुख्यमंत्री यांचे सचिव
उपमुख्यमंत्री यांचे सचिव
शासनाचे मुख्य सचिव
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
प्रबंधक, उच्चा नयायालय (अपल शाखा), मुंबई
प्रबंधक लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय मुंबई
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद/विधानसभा),मुंबई
महालेखापाल-१ (लेखा व अनुोयता), महाराष्ट्र-१, मुंबई
महालेखापाल-२ (लेखा व अनुोयता), महाराष्ट्र-१, मुंबई
महालेखापाल-१ (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
महालेखापाल-१ (लेखा व परिक्षा), महाराष्ट, नागपूर
शासनाचे सर्व उपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
पोलीस महासंचालक मुंबई
सर्व पोलीस उपमहासंचालक
सर्व पोलीस आयुक्त
सर्व महापालिकांचे आयुक्त
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान मंडळ मर्यादीत, पहीला मजला, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण इमारत, ३ महानगरपालिका, मुंबई - ४०० ००१
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व नगरपालिकांचे मुख्याधिकारी
सर्व मंत्रालयीन विभाग
सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मंबई/ लेशाकोष भवन, वांद्रे (पू.),मुंबई
निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
मंत्रालय विभागाच्या नियंत्रणाखाली सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती (२ प्रती)